विशेष गरजा असणाऱ्या (दिव्यांग) विद्यार्थ्यांना परीक्षेसाठी लेखनिक देणेबाबत सूचना.

**महाराष्ट्र शासन**
**शालेय शिक्षण व क्रीडा विभाग**
**शासन परिपत्रक क्रमांकः संकिर्ण २०१५/११९-अ/एसडी-६**
मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२
तारीख: १५ फेब्रुवारी, २०१६.

वाचा -

शासन निर्णय क्रमांकः संकिर्ण २०१५/(११९-अ)/एसडी-६, दिनांक ८/०१/२०१६

प्रस्तावना -

विशेष गरजा असणाऱ्या (दिव्यांग) विद्यार्थ्यांना शैक्षणिक मुल्यमापनामध्ये गरजेनुसार सोयी-सवलती देण्यासंदर्भात शासन स्तरावरुन समिती गठित करण्यात आली होती. या समितीच्या शिफारशीनुसार इयत्ता १ ली ते इयत्ता १२ पर्यंतच्या विद्यार्थ्यांना सोयी-सवलती देण्याबाबत संदर्भाधीन शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे. सदर निर्णयाच्या अनुषंगाने विशेष गरजा असणाऱ्या विद्यार्थ्यांना परिक्षा देताना अडचणी उद्भवू नये या अनुषंगाने लेखनिक देण्यासंदर्भात संबंधित पात्र विद्यार्थ्यांनी मागणी केल्यास लेखनिक पुरविण्यासंदर्भात खालीलप्रमाणे मार्गदर्शक सूचना देण्यात येत आहे.

**शासन परिपत्रक -**

**१) खालील नमूद विशेष गरजा (दिव्यांग) असणाऱ्या विद्यार्थ्यांना लेखनिक घेता येईल.**

अ) अंशत: अंध / पूर्णत: अंध
ब) अस्थिव्यंग (लेखन करणेचे हाताने अक्षम)
क) बहुविकलांग
ड) अध्ययन अक्षम
इ) स्वमग्न
ई) सेरेबल पाल्सी
फ) मतिमंद

**२) लेखनिक घेण्याबाबतचे निकष:-**

१. लेखनिक निवडताना प्राधान्याने परीक्षा द्यावयाच्या वर्गाच्या एक इयत्ता खालच्या वर्गाचा विद्यार्थी निवडण्यात यावा.

२. उपरोक्त १ येथे नमूद प्रमाणे लेखनिक उपलब्ध होत नसल्यास प्रौढ (Adult) लेखनिक घेता येईल.

३. प्रौढ (Adult) लेखनिक हे शाळेतील अथवा अन्य शाळेतील शिक्षक, खाजगी शिकवणी वर्गातील शिक्षक / प्रतिनिधी, विद्यार्थ्यांचे जवळचे नातेवाईक नसावेत. तथापि, विशेष बाब म्हणून जवळच्या नातेवाईकांना लेखनिक म्हणून परवानगी देण्याचे अधिकार (प्रकरणांची शहानिशा करुन) संबंधित अध्यक्ष विभागीय मंडळ यांना राहील.

४. दिव्यांग विद्यार्थ्यांना " मागील इयत्तेचा विद्यार्थी अथवा प्रौढ", लेखनिक म्हणून नेमून देण्याचे अधिकार संबंधित शाळेच्या मुख्याध्यापकांना राहतील. दिव्यांग विद्यार्थ्यांच्या असलेल्या अडचणी व गरज याबद्दलची जाणीव संबंधित शाळेच्या मुख्याध्यापकांना असल्याने हे अधिकार त्यांना राहतील.

**३. दिव्यांग विद्यार्थ्यांना लेखनिक देण्याकरीता शिफारस देण्याची जबाबदारी व त्याची पध्दत:-**

अ) शाळेतील मुख्याध्यापक / कनिष्ठ महाविद्यालयांचे प्राचार्य सदर विद्यार्थ्यांसाठी लेखनिक देण्याबाबत स्पष्ट अभिप्राय /शिफारशीसह संबंधित विभागीय शिक्षण मंडळाकडे शिफारस करतील. विभागीय मंडळ प्रस्तावांच्या मान्यतेबाबत तात्काळ संबंधित शाळा /कनिष्ठ महाविद्यालय यांना लेखी कळवतील.

ब) ज्या विद्यार्थ्यांस लेखनिक दिले जातील त्या लेखनिकाचा तपशील शाळेचे मुख्याध्यापक / कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य संबंधित (प्रौढ लेखनिकाचे शासन मान्य ओळखपत्राची प्रत व पालकांचा अर्ज या तपशिलासह) विभागीय शिक्षण मंडळाकडे सादर करतील.

क) अपवादात्मक परिस्थितीमध्ये ऐनवेळी लेखनिक देण्याबाबतचा निर्णय संबंधित सेंटरप्रमुखास घ्यावा लागल्यास, त्यांना त्याबाबतचा अधिकार राहील व त्यांनी संपूर्ण वस्तुस्थितीसह विभागीय परीक्षा मंडळाची याकरीता कार्योत्तर मान्यता घ्यावी. तसेच विभागीय मंडळाने याकरीता योग्य ते सहकार्य करावे.

४) **राज्य मंडळातर्फे हेल्पलाईन :-** राज्य मंडळातर्फे इयत्ता १० वी व इयत्ता १२ वी च्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शनास्तव Help line सुरु करण्यात येते. त्या Help line वर या संदर्भात कोणतेही प्रश्न असल्यास संपर्क करता येवू शकेल.

**५)** शासन निर्णय दिनांक ०८ जानेवारी, २०१६ कर्णबधिर विद्यार्थ्यांकरीता परीक्षा पेपर सोडविण्यासाठी प्रतितास ३० मिनिटे अधिक वेळ दिला जावा असे नमूद केले आहे. तथापि, ही सवलत प्रतितास २० मिनिटे इतक्या कालावधीसाठी राहील.

**६)** शासन निर्णय दिनांक ०८ जानेवारी, २०१६ मध्ये गणकयंत्राची सुविधा अंध विद्यार्थ्यांना देण्यात आलेली आहे. ही सवलत बहुविकलांग, ऑटीस्टीक, सेरेबल पाल्सी, मतिमंद या विशेष गरजा असणा-या इयत्ता १० वी व १२ वी च्या विद्यार्थ्यांना देखील गणकयंत्राची सुविधा लागू राहील.

**७)** शासन निर्णय दिनांक ०८ जानेवारी, २०१६ मध्ये पृ ७/प. येथे नमूद केल्याप्रमाणे विषय योजनेतील तृतीय भाषेमध्ये १० ऐवजी १०० गुण राहतील.

हे आदेश या शैक्षणिक २०१५-१६ वर्षापासून लागू रहातील.

हे शासन परिपत्रक सर्व शाळांचे मुख्याध्यापक व कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य यांच्यापर्यंत तसेच सर्व पालकांपर्यंत पोहचेल, याकरिता आवश्यक सूचना क्षेत्रिय स्तरावरुन निर्गमित करण्यात याव्यात व मंडळाने आपल्या संकेतस्थळावरही प्रदर्शित कराव्यात.

संबंधित शाळाप्रमुख व परीक्षा मंडळ यांनी या शासन परिपत्रकामध्ये नमूद केलेल्या वरील प्रमाणे नमूद दिव्यांग विद्यार्थ्यांना मागणी नुसार लेखनिक देणेबाबत कार्यवाही करावी. कोणताही सवलत पात्र विद्यार्थी या सवलतीपासून वंचित राहणार नाही याची दक्षता घ्यावी.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१६०२१५१७२९३९२१२१ असा आहे. हे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Suvarna S Kharat

Digitally signed by Suvarna S Kharat
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=School And Education Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=8a98fe3e5a45c818668168cffd366aced9a44c59607f616a36d403a80e74d0df, cn=Suvarna S Kharat
Date: 2016.02.15 17:32:31 +05'30'

**( डॉ.सुवर्णा खरात )**
**उप सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग**

**प्रत,**

१) मा. राज्यपालांचे सचिव, राजभवन, मुंबई.
२) मा. मुख्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मुंबई
३) अप्पर मुख्य सचिव, वैद्यकिय शिक्षण व द्रव्ये विभाग, मुंबई.
४) मा. मुख्य सचिव यांचे खाजगी सचिव, मुंबई.
५) मा.मंत्री, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग यांचे खाजगी सचिव.
६) मा. प्रधान सचिव, (शालेय शिक्षण व क्रीडा विभाग) यांचे स्वीय सहाय्यक.
७) आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे.
८) आयुक्त, अपंग कल्याण आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
९) राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई.
१०)राज्य प्रकल्प संचालक, राष्ट्रीय माध्यमिक शिक्षा अभियान, मुंबई
११)अध्यक्ष, माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, महाराष्ट्र राज्य, पुणे.
१२)शिक्षण संचालक (प्राथमिक/माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे.
१३)संचालक, महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे.
१४)अध्यक्ष / सचिव, आय.सी.एस.ई, नवी दिल्ली.
१५)अध्यक्ष / सचिव, केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळ.
१६)सर्व विभागीय अध्यक्ष / सचिव, माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ.
१७)सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक.
१८)शिक्षणाधिकारी (प्राथमिक / माध्यमिक), जिल्हा परिषद सर्व.

१९)शिक्षण निरिक्षक बृहन्मुंबई.
२०)प्रशासन अधिकारी, महानगरपालिका सर्व.
२१)उपसंचालक, आरोग्य सेवा, सर्व विभाग.
२२)अधिष्ठाता, जे.जे.हॉस्पिटल, मुंबई.
२३)अधिष्ठाता, के.इ.म.हॉस्पिटल, मुंबई.
२४)अधिष्ठाता, नायर हॉस्पिटल, मुंबई.
२५)अधिष्ठाता, सायन हॉस्पिटल, मुंबई.
२६)अधिष्ठाता, कूपर हॉस्पिटल, मुंबई.
२७)अधिष्ठाता, राजावाडी हॉस्पिटल, मुंबई.
२८)वैद्यकिय अधिक्षक, भगवती हॉस्पिटल, मुंबई.
२९)जिल्हा शल्यचिकित्सक, सर्व जिल्हे.
३०)जिल्हा वैद्यकिय अधिकारी, सर्व जिल्हे.
३१)निवड नस्ती एसडी-६.